# ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी(RIDF-XVI) अंतर्गत मेगा पाणलोट विकास कार्यक्रम मार्गदर्शक सुचना

राज्यातील पर्जन्यमान हे अनिश्चित व खंडीत स्वरुपाचे असल्यामुळे त्याचा थेट परिणाम पिकाच्या उत्पादकतेवर होतो, त्यामुळे राज्यात पाणलोट विकास क्षेत्राचा कार्यक्रमास अनन्य साधारण महत्व आहे. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या अनेक योजना शासनाने हाती घेतल्या असून, पाणलोट क्षेत्राचा विकास गतीमान पध्दतीने करण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला आहे.

राज्यातील पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत नाबार्डकडून कर्ज उपलब्ध करुन राज्यातील 793 उच्च प्राथमिकता असलेल्या पाणलोटापैकी 68 मेगा पाणलोटातील 260 क्लस्टर पाणलोट पूर्ण करणेकरीता शासन निर्णय क्र. नाबार्ड-2010/प्र.क्र.91/जल-7,दि. 18/1/2011 अन्वये मान्यता दिलेली आहे.

**प्रकल्पाची उदिष्टे :-**

- पाणलोट क्षेत्र विकासाच्या सर्वमान्य उद्दीष्टांसोबत पाणलोट विकासाच्या माध्यमातून निर्माण होणा-या कृषि आधारीत स्वयंरोजगाराच्या संधीव्दारे समाज घटकांची आर्थिक उन्नती साधणे.
- ग्रामसभेच्या मान्यतेने, लोक सहभागातून व त्यांच्या संमतीने स्थानिक परिस्थिती व नैसर्गिक उपलब्ध पायाभूत संसाधनांचा विचार करुन प्रकल्प नियोजन करणे. मृद व जलसंधारण (In situ व ex situ) या पध्दतीने कामासोबतच संसधान आधारीत स्वयंरोजगाराचे दीर्घकालीन नियोजन करणे.
- पाणलोट विकास कार्यक्रमाबरोबरच पाणलोट क्षेत्रातील शेतक-यांसाठी, भुमिहिन , शेतमजुर, महिला यांचेसाठी उदरनिर्वाहाची साधने निर्माण करणेसाठी नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे.
- पाण्याच्या ताळेबंदाविषयी जनजागृती व सक्षमतेने पाणी वापर या संदर्भात प्रबोधन करणे.

www.mahaagri.gov.in

- दिर्घकालीन शाश्वत रोजगार निर्मितीवर भर देणे, व कृषि आधारीत अर्थव्यवस्था बळकट करणे. तसेच वेगवेगळ्या शेती पध्दती उदा. कृषि + पशुधन विकास, कृषि + फलोत्पादन विकास, कृषि + दुग्ध व्यवसाय इ. ची अंमलबजावणी करणे.
- दिर्घकालीन शाश्वत देखभाल दुरुस्ती कायमस्वरुपी सहभागी पध्दतीने करण्यासाठी पाणलोट देखभाल निधी उभारणे

..2



**प्रकल्प अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना :-**

मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेअंतर्गत जिल्हा, प्रकल्प व गांवस्तरावर खालीलप्रमाणे संस्थात्मक रचना आहे.

- **जिल्हास्तरावरील जिल्हा पाणलोट विकास युनिट : (DWDU)**

पाणलोट विकासाचे जिल्हास्तरावर काम पहाणेसाठी जिल्हा पाणलोट विकास युनिटची स्थापना करण्यात आलेली आहे. जिल्हा पाणलोट विकास युनिट, जिल्हा नियोजन समिती बरोबर निकट समन्वयनाने कामकाज करीत असून या योजनेसाठी जिल्हास्तर समिती किंवा जिल्हाधिकारी यांची प्रकल्पाला मान्यता घेण्यात येते व शासन मान्यतेसाठी विहीत मार्गाने सविस्तर प्रकल्प अहवाल आयुक्तालयास सादर करण्यात येतात. आयुक्तालय व नाबार्ड यांच्या संयुक्त छाननी समितीव्दारे सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करण्यात येऊन सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर केले जातात.

- **प्रकल्प स्तरावरील प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण: (PIA)**

प्रकल्प क्षेत्रात कार्यक्रमाचे कालबध्द नियोजन, व्यवस्थापन, समन्वयन, सनियंत्रण व अंमलबजावणी इ. कामे करण्यासाठी प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाची आवश्यकता असते. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत निवडलेल्या पाणलोटाकरीता ज्या पाणलोटामध्ये वनक्षेत्र 50 टक्केच्या वर असेल त्याठिकाणी वनविभाग प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (PIA) म्हणून काम करीत आहे. तसेच अशा पाणलोटामध्ये वनक्षेत्रात वनविभाग

www.mahaagri.gov.in

काम करीत असून बिगर वनक्षेत्रात कृषि विभाग काम करीत आहे. अशा पाणलोटाचे पाणलोट विकास पथकामध्ये (WDT) कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांचा समावेश करण्यात येत आहे.

ज्या पाणलोटामध्ये कृषि क्षेत्र 50 टक्केच्या वर असेल त्याठिकाणी कृषि विभाग प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (PIA) म्हणून काम करीत आहे. अशा पाणलोटाचे पाणलोट विकास पथकामध्ये (WDT) वन विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांचा समावेश करण्यात येत आहे.

- **पाणलोट विकास पथक : (WDT)**

पाणलोट विकास पथक हे प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणाचा एक अविभाज्य भाग असून योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रत्येक पाणलोट विकास पथकाचे 4 सदस्य नियुक्त करण्यात येत आहेत. पाणलोट

विकास पथकामध्ये

1. कृषि/वन विषय सदस्य क्र.1 हा पाणलोट प्रकल्पातील कृषि किंवा वन विभागाचा कर्मचारी
   सदस्य म्हणून काम पाहील. ..3



2. कृषि/वन विषय सदस्य क्र.2
3. समाज कार्यकर्ता सदस्य क्र.3
4. संस्थात्मक बाधणी/पशुसंवर्धन सदस्य क्र.4

वरील सदस्यापैकी सदस्य क्र.2 ते क्र.4 या सदस्याची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. नाबार्ड-2011/प्र.क्र.188/जल-7,दि.26 मार्च 2012 अन्वये पाणलोट विकास पथकातील सदस्य क्र.2 व क्र.4 या सदस्यांची निवड व नेमणूक महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) या सेवापुरवठादार संस्थेकडून आणि सदस्य क्र.3 ची निवड कर्वे समाजसेवा संस्था,कर्वेनगर पुणे.यांचेमार्फत करण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे.

www.mahaagri.gov.in

प्रत्येक 10 ते 15 सुक्ष्म पाणलोट समुहाच्या पाणलोट प्रकल्पाकरिता (क्लस्टर) किंवा सर्वसाधारणपणे 5000 हे. प्रकल्पाचे (उपचाराचे) क्षेत्राकरिता एक पाणलोट विकास पथकाची नियुक्ती करण्यात येत आहे.

- **गावपातळीवर संस्थात्मक रचना व लोकसहभाग :-**

**१. स्वयंसहायता गट : (Self-Help Groups)**

पाणलोट समितीमार्फत पाणलोट विकास पथकाच्या (WDT) सहाय्याने सर्व शेतकरी, भूमिहीन/मत्ता नसलेले गरीब शेतमजूर, स्त्रिया, धनगर व अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून पाणलोट क्षेत्रांमध्ये स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यात येत आहे.

**२. उपभोक्ता गट : (Users Groups)**

पाणलोट समितीमार्फत (WC) पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रामध्ये उपभोक्ता गटांची देखील स्थापना करण्यात येईल. प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्व मत्तांच्या प्रवर्तनासाठी व देखभालीसाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहयोगाने उपभोक्ता गट जबाबदार असेल.

**३. पाणलोट समिती : (WC)**

पाणलोट प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालानूसार (DPR) नुसार अंमलबजावणी करण्यासाठी, संबंधीत गावाच्या ग्रामसभेकडून पाणलोट समितीची (WC) स्थापना करण्यात येत आहे. पाणलोट समिती कमीत कमी 15 सदस्यांची मिळून बनलेली असेल, पाणलोट विकास पथकातील एक सदस्य व संबंधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेचा क्षेत्रिय स्तरावरील कर्मचारी सदस्य म्हणुन पाणलोट समितीमध्ये प्रतिनिधित्व करेल.

www.mahaagri.gov.in

शासन निर्णय क्र एपाव्य 2012/प्र.क्र104/जल-8 दिनांक 18 एप्रिल,2013 अन्वेय दि.27 सप्टेंबर 2012 पुर्वी ज्या ग्रामपंचायतीमध्ये पाणलोट समित्या ग्रामसभेव्दारे निवड व नियुक्त झाल्या होत्या त्या पूर्वीप्रमाणेच अस्तित्वात राहतील व पुढेही काम पाहतील पाणलोट समीतीची रचना पुर्वी प्रमाणेच राहिल. तसेच यापुढे सामायिक मार्गदर्शक सूचना 2008 सुधारित आवृत्ती 2011 परि.6.3 मध्ये नमूद तरतूदीनुसार पाणलोट समित्या निवड व नियुक्त करण्याचे अधिकार ग्रामसभेलाच राहतील असे सुचित करण्यात आले आहे.

- **प्रकल्प व्यवस्थापन :**

  प्रकल्प कालावधी हा 5 वर्षांचा असून सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित प्रकल्प कालावधीचे सविस्तर विवरण देणेविषयी क्षेत्रिय स्तरावर सुचित केलेले आहे. प्रकल्प कालावधी खालील विभिन्न भागांमध्ये विभागलेला आहे.

| **भाग** | **नांव** | **कालावधी** |
|---|---|---|
| एक | पर्वतयारी टप्पा | 1 वर्षे |
| दोन | पाणलोटाची कामे टप्पा | 3 वर्षे |
| तीन | एकत्रिकरण व प्रकल्पोत्तर | 1 वर्षे |

**पाणलोट प्रकल्पातील विविध घटकांकरिता तरतुदीचे वाटप**

पाणलोट प्रकल्पामध्ये पाणलोट विकास कामासाठी प्रकल्प मुल्याच्या 70 टक्के निधी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे व उर्वरित 30 टक्के निधी रकमेची इतर बाबीवरील तरतूद खालीलप्रमाणे

| **अ क** | **अर्थसंकल्पीय घटक** | **वाटप टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 | प्रशासकीय खर्च | 10 |
| 2 | संनियंत्रण | 1 |
| 3 | मूल्यमापन | 1 |
| | **पूर्व तयारी टप्पा :** | |
| 4 | प्रेरक प्रवेश उपक्रम | 2.5 |
| 5 | संस्था व क्षमता बांधणी | 5 |
| 6 | सविस्तर प्रकल्प अहवाल | 0.5 |
| | **पाणलोट कामांचा टप्पा :** | |
| 7 | पाणलोट विकास कामे | 70 |
| 8 | मत्ता नसणा-या व्यक्तींकरिता उपजीविका | 5 |
| 9 | उत्पादन पध्दती व सूक्ष्म उद्योजकता | 5 |
| **10** | **एकत्रीकरण टप्पा :** | 0 |
| | **एकूण** | 100 |

www.mahaagri.gov.in

पाणलोट कामासाठी उपलब्ध असलेल्या प्रकल्प किंमतीच्या 70 टक्के निधीमधून राबविण्यात येणाऱ्या उपचारासाठी 80 टक्के निधी हा जमिन उपचारावर व 20 टक्के निधी हा ओघळ नियंत्रण उपचारासाठी प्रस्तावित करण्यात येईल.

**निधी वितरण पध्दत :-**

शासनाकडून आयुक्तालय स्तरावर अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे (BDS) निधी प्राप्त होतो, सदर निधी संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे वितरीत करण्यात येतो. विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा तालूका कृषि अधिकारी/वनविभाग यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीव्दारे निधी वितरीत करण्यात येतो. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा तालूका कृषि अधिकारी/वनविभाग यांचेकडून प्रशासकीय खर्चासाठी आवश्यक निधी राखून ठेवण्यात येऊन पाणलोट विकास कामाबाबतचा निधी संबंधित पाणलोट समितीच्या खात्यावर निधी जमा करण्यात येतो.

सन 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये कार्यान्वित 25 क्लस्टर पाणलोटाकरीता वितरीत करण्यात येणाया निधीचा अर्थसंकल्पीय घटकनिहाय विगतवारीनुसार खर्च करण्यात यावा.तसेच ही योजना नार्बाडच्या अर्थसहाय्यातून राबविण्यात येत असल्याने नाबार्डच्या विहित प्रपत्रानुसार त्रैमासिक खर्चाचे अहवाल व खर्चाच्या रकमेचे प्रतिपूर्ती दावे विहित वेळापत्रकानुसार आयुक्तालयास सादर करण्यात यावे.

www.mahaagri.gov.in